Topic

Date / /20

Page:

** SEMINAR **

श्री. संपतराव माने महाविद्यालय
खानापूर

पेपर :- भाषाविज्ञान आणि मराठी
भाषा

विषय :- भाषेचे स्वरूप वैशिष्ट्ये कार्य

नाव :- देशमुख निकिता शंकर

रोल नंबर :- 336

पेपर नंबर :- ८ BA भाग तीन मराठी
विभाग

मार्गदर्शक :- प्रा. लादे आर. एस

09/10

JHA PRODUCT Flowers

Date / /20
Page: 1

Topic

# ** भाषेचे स्वरुप वैशिष्ट्ये आणि कार्य **

* **भाषेच्या व्याख्या :-** माणुस हा बोलणारा प्राणी आहे. अशी माणसाची एक व्याख्या केली जाते. कारण भाषा हा माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. माणुस उच्चशिक्षित असो वा अशिक्षित, नोकरदार असो वा बेकार, स्त्री असो वा पुरुष, श्रीमंत असो वा गरिब सर्वच तो भाषा वापरतच असतो. आपल्या मनातील विचार कल्पना, भावना तो भाषेच्याच आधारे व्यक्त करत असतो. भाषा येत नाही असा समाज आणि अशी व्यक्ती या पृथ्वीवर सापडणारच नाही. एकमेकांशी संपर्क करणे, विनिमय करणे आणि संदेशन करणे हे केवळ भाषेपुरतेच होते.

१) कृ. पां. कुलकर्णी :- मराठी उद्गम आणि विकास
भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ आणि अन्वित ध्वनींचा समुह होय.

२) ना. गो. कालेलकर - भाषा आणि संस्कृती :
मुक्त आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली समाजव्यवहारास साहाय्यभुत अशी भाषा ही एक पध्दत आहे.

JHA PRODUCT Flowers

Topic
Date / /20
Page: 2

# *** * भाषेचे स्वरूप *****

भाषा म्हणजे सार्थ ध्वनिसमुह असे आपण पाहिले. पण मुखावाटे बोलली जाणारी भाषा निर्माण होण्यापूर्वी मानव एकमेकांशी संपर्क साधत होता. तो हावभाव, चिन्हे, चित्रे अशा भाषेवर माध्यमांचा वापर करत होता. यालाच ध्वन्येतर साधने असेही म्हटले जाते. याविषयी थोडक्यात पाहू -

**अ: हावभाव :-** जेव्हा ध्वनीची भाषा नव्हती तेव्हाही मानवाला स्वतःचे विचार, स्वत:च्या भावना इतरांना सांगायची, आत्माविष्काराची गरज वाटली असणारच. भुक भिती, प्रेम अशा मुलभुत भावना व्यक्त करण्यासाठी त्याने हावभावांचा वापर केला असावा. यालाच हावभावांची भाषा किंवा देहबोली किंवा ईंगित भाषा म्हणतात.

१) कितिही कौशल्याने हावभाव केले तरी संपूर्ण मनोगत सांगता येत नाही.
२) दूर अंतरावरुन हावभाव नीट दिसत नाही.
३) रात्रीच्या अंधारात हावभाव दिसतच नाहित
४) भिंत, डोंगर, झाड अशा अपारदर्शक वस्तुंच्या आडुन हावभाव केले तरी ते दिसत नाहित.

JHA PRODUCT Flowers

Topic ______ Date / /20 Page: 3

**ब = चिन्हे :- ******

ध्वनीची भाषा प्रगत होण्यापूर्वी मानव चिन्हे वापरत असावा आजही विशिष्ट अर्थाचा बोध व्हावा म्हणुन सूचक चिन्हांचा उपयोग करण्याची पध्दत सर्वांना माहितीची आहे.

उदा :- घरात मंगलकार्य असेल तर सुपारी व अक्षता दिली जाते. धोका दाखविण्यासाठी लाल दिवा लावला जातो. रस्त्यावर तर अनेक चिन्हे काढली जातात.

उदा :- पुलाची खूण, वळण, एकेरी वाहतुक, रस्त्यातील वाहतुक नियंत्रण करण्यासाठी लावलेल्या लाल, पिवळे, हिरवे दिवे इत्यादी चिन्हे.

**क = चित्रे ********

आदिमानवाची हावभावांची भाषा होती तशीच चित्रांचीही भाषा होती. काही गुहांमध्ये अशी चित्रे सापडली आहेत. एखादया प्राण्याचे चित्र, शिकारीचे चित्र, मासे, पक्षी, डोंगर अशी कितीतरी चित्रे काढुन मानवाने आपल्या भावना इतरांपर्यंत पोहोचवल्या आहेत. चित्री भाषा ही तर चित्रलिपीच आहे. अर्थात, या माध्यमाला फारच मर्यादा आहेत. चित्र काढणे हे केवळ कलाकारालाच जमू शकेल व ते वेळखाऊकाम आहे.

JHA PRODUCT Flowers

Topic

Date / /20

Page: 4

## ** ३ :- ध्वनीची भाषा *****

विचार, भावना, कल्पना व्यक्त करण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे ध्वनीची भाषा होय. या ध्वनीच्या भाषेमुळेच मानवाची खऱ्या अर्थाने प्रगती झाली. विकास झाला व तो इतर प्राण्यांपासून वेगळा ठरला 'बोलणारा प्राणी' ठरला.

## १. भाषा - समाजव्यवहाराचे साधन

माणूस हा सर्व प्राण्यांत बुद्धिमान समजला जातो. पण तो समाजप्रिय प्राणी आहे हेच खरे आहे. म्हणूनच म्हणतात, मॅन इज अ सोशल ॲनिमल. माणूस कधी एकटा - दुकटा जगू शकत नाही. तो नेहमी समूहानेच राहतो. व्यक्तीशिवाय समाजाला अस्तित्व नाही आणि समाजाशिवाय व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही.

समाजात जगत असताना व्यक्तीला भाषेची गरज पडते. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, संप्रेषणासाठी भाषेची गरज पडतेच पडते. एकमेकांशी बोलत असताना प्रत्येकाला काही संकेत पाळावे लागतात. प्रत्येकाचे उच्चार भिन्न असले तरी सर्वसामान्यपणे उच्चार सारखेच करावे लागतात. आपले विचार सांगण्यासाठी सुखदुःखांची अभिव्यक्ती भाषा वापरावी लागते.

Topic

Date / /20
Page: 5

## ** 2. ध्वनिमाध्यमता *****

ध्वनियुक्त भाषा ही मानवी मुखेंद्रियातून निर्माण झाली आहे. जीभ, दात, टाळु, ओठ, स्वरयंत्र अशा मुखेंद्रियांच्या मदतीने मानव विविध स्वर व व्यंजने निर्माण करतो आणि शब्द, वाक्य बनवत आपले विचार, अनुभव मांडतो.

ध्वनियुक्त भाषा ही ध्वन्येतर भाषांपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ आहे. अंधार असला, मध्ये भिंत वा अन्य अपारदर्शक वस्तु असली तरी भाषा ऐकु येते व समजते. बोलत असताना म्हणजेच ध्वनीचे उच्चारण करत असताना आपण इतर कामे सहज करु शकतो.

## *3. प्रतीकात्मकता *****

भाषा ही ध्वनीपासून बनली आहे. हे ध्वनी विशिष्ट अर्थ व्यक्त करतात. पण हे ध्वनी व ती वस्तु यांचा कार्यकारण संबंध नसतो. हे ध्वनी केवळ प्रतीक असतात. उदाहरणार्थ झाड हा शब्द व प्रत्यक्ष झाड यांचा अर्थाअर्थी काहीच संबंध नाही. झाड हे केवळ एक प्रतीक आहे. झाड या शब्दाने व्यक्त होणारी वस्तु म्हणजे खोड, पाने फळे असलेल्या वृक्ष होय. खुर्ला खडू का म्हणायचे? गाय या ध्वनीतुन विशिष्ट प्राणीच का व्यक्त होतो?

Topic ______ Date / /20 Page: 6

**** 4. संकेतबद्धता *******

भाषा ही प्रतीकात्मक आहे हे आपण पाहिले तशीच ती संकेतात्मकही आहे. भाषा ही केवळ ध्वनीही नाही. हावभावांची भाषा, चिन्हांची भाषा प्राण्या-पक्ष्यांची भाषा चित्रांची भाषा, मोबाईलची भाषा, संगणकाची भाषा अशी भाषेची यादी लांबवता येईल. संपर्कासाठी आपण एखादे माध्यम निवडतो. त्याची संकेतप्रणाली ठरलेली असते.
उदा :- लाल रंग म्हणजे धोका. सनईचे सूर म्हणजे मंगलकार्य. रस्त्यावरील सिग्नलचा लाल रंग म्हणजे थांबायची सूचना व हिरवा रंग म्हणजे जाण्याची सूचना.

**** ५. भाषा: एक पद्धती *****

भाषा ही यादृच्छिक ध्वनिसंकेतांनी बनलेली आहे. हे संकेत काही नियमांनी बनलेले असतात. भाषेच्या जडणघडणीत आणि वापरात एक विशिष्ट व्यवस्था असते. म्हणून भाषा ही एक पद्धती System आहे असे म्हणतात.

भाषेच्या परस्परसंबंधी अशा निरनिराळ्या पद्धती असतात. या पद्धतींच्या एकीकरणातून भाषेची व्यवस्था सिद्ध होत असते. मानव जे ध्वनी निर्माण करतो त्यापैकी भाषेत फारच थोडे ध्वनी वापरले जातात.

JHA PRODUCT Flowers

# ६. भाषा मानवी आहे *****

मानवाशिवाय अन्य प्राणी एकमेकांशी संपर्क करतात पण भाषा ही केवळ मानवाची निर्मिती आहे. मुखातील इंद्रियांचा उपयोग करून फक्त मानवच बोलु शकतो. ओठ, दात, टाळू, जीभ मूर्धा, पडजीभ यांसारख्या मुखातील इंद्रियांचा वापर करून हवा घेताना, सोडताना काही आवाज मुखावाटे बाहेर पडतात, या आवाजांना, या ध्वनींना मानव विशिष्ट अर्थ देतो व त्या अर्थाद्वारे स्वतःचे विचार इतरांपर्यंत पोहोचवतो.

१) पहिला टप्पा:- विशिष्ट वस्तुदर्शन → इंद्रियांद्वारे प्रतीती
गुणवैशिष्ट्य → पूर्ण प्रतिमा → सहज ध्वनी उच्चार

# * मानवी आणि मानवेतर संप्रेषण **

मानव आपले विचार, भावना, कल्पना इतरांपर्यंत पोहोचवायला भाषेची मदत घेतो. ही भाषा कधी हावभावांची असते तर कधी चिन्हांची असते तर कधी चित्रांची असते. मानव भाषेशिवाय खुणांनी आणि हावभावांनी जे संप्रेषण करतो त्यास भाषेतर संप्रेषण म्हणतात.

मधमाशा हवेत उडताना आपण पाहतो हे त्यांचे विशिष्ट पद्धतीने नृत्य असते पोळ्याभोवती त्या नृत्य करतात. व या नृत्यावरून मध कोणत्या दिशेला आहे ते समजते.

JHA PRODUCT Flowers

Topic ____________ Date / /20 Page: 8

# * भाषिक संप्रेषण *******

मानवाने लावलेला भाषेचा शोध हा मानवाच्या उत्क्रांतीतील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. भाषा नसती तर मानवाची एवढी प्रगती झाली असती का हे सांगणे अवघड आहे.

भाषिक संप्रेषण (वाक् इंद्रिये)

- अभाषिक संप्रेषण
  - हसणे
  - रडणे
  - ढेकर देणे
  - जांभई देणे
  - बोलणे
  - आवाज
    - खसखस
    - लहान-मोठा
    - हळू-भरभर
    - कर्णकटू
- भाषिक संप्रेषण
  - चिन्हांकित
    - खंडकीय
    - स्वन
    - स्वनिम
    - रूपिम
    - पदबंध
    - वाक्यांश
    - वाक्य
  - पराखंडकीय
    - अचिन्हांकित
    - सुरावली
    - बलाघात
    - सीमासंधी
    - नासिक्यरंजन
    - अवधी

भाषा बोलणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या भाषेवर परिणाम होत असतो. मुखेंद्रिये, कर्णेंद्रिये लिंग, जात, वय, शिक्षण, व्यवसाय सांस्कृतिक संदर्भ यांच्या माध्यमातून भाषिकाची व्यक्तिगत विशिष्टता सिद्ध होत असते.

JHA PRODUCT Flowers

# *भाषेबद्दलचे दृष्टिकोण व समजुती

बोलणारे प्राणी म्हणजे माणूस अशी माण-साची एक व्याख्या आहे. ती योग्यच आहे. कारण जन्माला आल्यापासून मानव भाषा ऐकत व बोलत असतो. ती अखेरपर्यंत. भाषेला त्याच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. भाषा ही त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे.

## * उच्चार :-

चमचा, चकोर, चहा, चादर
चलन : च्यलन, चाप : च्याप
जपान, जहाज
जग : ज्याग, जास्त : ज्यास्त

तसेच इंग्रजीतही यू चा उच्चार काही वेळा अ होतो तर काही वेळा उ होतो उदा -

but येथे u चा उच्चार अ होतो
Put येथे u चा उच्चार उ होतो.

संप्रेषण / संज्ञापन / संदेशन

↓ ध्वन्येतर → हावभाव, चित्रे, चिन्हे

↓ ध्वनीमाध्यमाद्वारे

9/10